## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि.९ ( ) पुणे येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ युवक महोत्सवात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पियुष बडगुजर या विद्यार्थ्यांने स्पॉट पेटींग या विषयात द्वितीय तर पोस्टर मेकींग स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ युवक महोत्सव पार पडला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला या महोत्सवात दोन पारितोषिके प्राप्त केली. महोत्सवात प्रियंका मेटकर, साधना राजपूत, राजश्री पाटील, पूजा बोरसे, रोशनी शुक्ला, अपूर्वा थत्ते, दिशा ढगे, शेफाली मदान, ज्ञानेश्वरी चौधरी, कुलदीप भालेराव, ऐश्वर्या परशुरामे, प्रज्ञा दुगल, पल्लवी सोनवणे, शिवानी माळी, पूजा तायडे, गरिष्मा पाटील, गायत्री भोसले, काजल कंडारे, कुमुदिनी पाटील, सारांश सोनार, तेजल पाटील, विशाल पाटील, सादिया शेख हे विद्यार्थी विविध कलाप्रकारात सहभागी झाले होते. संघ व्यवस्थापक म्हणून प्रा.मनोज पवार व प्रा.शितल पाटील सोबत होते. या यशाबद्दल कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते पियुष बडगुजर याचा सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, दीपक पाटील, प्रभारी वित्त व लेखाधिकारी सोमनाथ गोहिल, परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.एस.टी.इंगळे आदींनी अभिनंदन केले.

दरम्यान या आधी नाशिक येथे झालेल्या इंद्रधनुष्य या आंतरविद्यापीठ युवक महोत्सवात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने वादविवाद, स्पॉट फोटोग्राफी, पोस्टर मेकींग व स्पॉट पेटींग यामध्ये पारितोषिके प्राप्त केली. वादविवादमध्ये सारांश सोनार व शिवानी माळी यांनी द्वितीय पारितोषिके प्राप्त केले. तर पियुष बडगुजर याने स्पॉट फोटोग्राफीत द्वितीय, पोस्टर मेकींग व स्पॉट पेटींगमध्ये तृतीय पारितोषिक प्राप्त केले. या विद्यार्थ्यांचे देखील कुलगुरुंसह अधिकार मंडळाच्या सदस्यांनी अभिनंदन केले.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.९ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दृष्टी बाधित दिव्यांगासाठी रुसा समावेशी शिक्षण संसाधन केंद्रात लुईस ब्रेल यांच्या जयंतीनिमित्त सहयोगी तंत्रज्ञान वर आधारित सात दिवसीय निवासी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या वर्गाचे उद्‌घाटन आमदार स्मितााताई वाघ यांच्या हस्ते झाले.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उद्‌घाटन प्रसंगी विधान परिषदेच्या सदस्या श्रीमती स्मिता वाघ यांनी लुईस ब्रेल यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी बोलताना आमदार वाघ यांनी दिव्यांग बांधवाच्या मनातील भय व न्यूनगंड दूर करुन तंत्रज्ञानाचा वापर करुन सक्षम व स्वावलंबी बनावे असे आवाहन केले. भविष्यात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दिव्यांग बांधवांनी या केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी केले. सदर प्रशिक्षणासाठी जळगाव व धुळे जिल्हयातील आठ दृष्टी बाधित दिव्यांग बांधव प्रशिक्षणाचा लाभ घेत आहे. याप्रसंगी श्री.उदय वाघ, कुलसचिव भ.भा.पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डी.एस.सुर्यवंशी तसेच केंद्राचे समन्वयक डॉ.राम भावसार उपस्थित होते. या प्रशिक्षणाच्या आयोजनासाठी प्रा.दिपक सोनवणे तसेच केंद्राचे स्वयंसेवक दिव्या बोरसे व मयुर पाटील यांनी परिश्रम घेतले.

..२..

**बातमी क्र.३**

जळगाव दि. ९ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागाच्या दोन विद्यार्थिनी शिक्षणशास्त्र या विषयात नेट परीक्षा उत्तीर्ण झाल्या.

मनिषा चौधरी व जयश्री शिंगाडे या दोन विद्यार्थिनींनी हे यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे एम.एड.साठी प्रवेशित असतानाच या दोघींनी नेट परीक्षा उत्तीर्ण केली. आजपर्यंत या विभागाचे ७९ विद्यार्थी नेट व सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.विभागाकडून नेट/सेटसाठी मार्गदर्शन उपलब्ध करुन दिले जात असते व कार्यशाळा देखील घेतली जाते. एम.एड.च्या गुणवत्ता यादीत विभागाच्या प्रणाली सोनवणे या विद्यार्थिनीने द्वितीय स्थान प्राप्त केले आहे. या दोन्ही यशाबद्दल विभागप्रमुख डॉ.मनिषा इंदाणी, डॉ.संतोष खिराडे, डॉ.सीमा बारी, उमेश भोसले यांनी अभिनंदन केले.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांकः- ९ जानेवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी